MHRG110009662021

नि.दि.दा.क्र. ७७/२०२१

नियमित दिवाणी दावा क्र.७७/२०२१

(महेश येरुणकर व इतर वि. दशरथ दळवी)

निशाणी क्र.३४ खालील आदेश

वादींनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विरुध्द प्रतिदाव्यात झालेला विना कैफियत आदेश रद्द होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी कथन केले की, सदर प्रकरणात प्रतिवादी क्र.२ यांनी दि.२३.११.२०२३ रोजी वादींच्या दाव्यास कैफियत व प्रतिदावा दाखल केलेला आहे. त्यानंतर वादी क्र.१ यांना अपघातात झालेल्या दुखापतींमुळे gangering झाल्यामुळे त्यांना दवाखान्यात उपचार चालू होते. त्यामुळे वादींना प्रतिदाव्यावर मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. वादींनी प्रतिवादी क्र.२ च्या प्रतिदाव्यास आज रोजी कैफियत दाखल केली आहे. त्यामुळे प्रतिदाव्याच्या कामी वादींना त्यांच्या बचावाची संधी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. तशी संधी न मिळाल्यास वादींचे पैशाने कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. यातील वादी वकीलांमार्फत हजर झाले आहेत. वादींनी विहित मुदतीत त्यांचे लेखी म्हणणे व कैफियत देणे कायद्याने अपेक्षित होते. तसे न दिल्यामुळे त्यांच्याविरुध्द मे.न्यायालयाने दि.०४.०४.२०२४ रोजी नि.क्र.२७ वर विना कैफियत सुनावणी असा आदेश पारित केलेला आहे. तरी वादींविरुध्द झालेला विनाकैफियतचा हुकुम रद्द करणेचा आदेश व्हावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

३. प्रतिवादींतर्फे विद्वान विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जावरचे म्हणणे सादर करुन सदर अर्जावर विरोध दर्शविला आहे. प्रतिवादींनी कथन केले की, प्रतिवादी क्र.२ यांनी वादींविरुध्द काऊंटर क्लेम दि.२३.११.२०२३ रोजी दाखल केला आहे. सदर दाव्यावर दि.०४.०४.२०२४ रोजी No W.S. चा हुकूम मे.न्यायालयाने केला आहे. वादींनी सदरची कैफियत दाखल करताना दिलेल्या अर्जात कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. तसेच अर्जात किमी दिवसांचा उशीर कैफियत दाखल करण्यास झाला याचा कुठेही उल्लेख नाही. वादींनी अपघातात झालेल्या दुखापतीचे कारण दिले आहे. परंतु त्या संदर्भातील उपचाराबाबत हॉस्पीटलचे कोणतेही कागदपत्र अर्जासोबत दाखल केलेले नाहीत. वादींनी या अर्जास कोणतेही संयुक्तीक कारण दिले नसलेने वादींचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

४. नि.३४ वरील अर्ज, त्यापुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व अर्जावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादी यांनी प्रतिवादींच्या प्रतिदाव्याला वेळेत कैफियत न दिल्यामुळे दि.०४.०४.२०२४ रोजी विना कैफियत चालविण्याचा आदेश पारित केला. प्रस्तुत प्रकरणात वादींनी आजारी असल्याचे कारण नमूद केले आहे. प्रस्तुतचा प्रतिदावा हा वादीविरुध्द जप्त दागिने परत मिळणेकरिता व वैकल्पीकरित्या रक्कम रु.१,८७,५००/– रुपये मिळणेकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रतिदाव्याचे स्वरुप पाहता वादींना त्यांची बाजू मांडून, दाव्याकामी

त्यांची कैफियत आल्यास दाव्याचे कामकाज पुढे चालून दावा गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वानुसार वादींना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. वादींनी कैफियत देण्यास केलेला विलंब विचारात घेता, वादींनी विलंबाबाबत प्रतिवादींना कॉस्ट देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादींचा निशाणी क्र.३४ वरील अर्ज वादीस र.रु.१,०००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2025.11.14 17:50:02 +0530

माणगाव. [श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः-१३.११.२०२५. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.